**दिनांक १४ / ०६ /२०२३ रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. १८**

**विषय:** स्वच्छ महराष्ट्र अभियान (ना) २.० अंतर्गत मंजूर शहर स्वच्छता कृती आराखडा नुसार विटा नगरपरिषदेचा Desludging Vehicle खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

**संदर्भ:** १. मा. मुख्याधिकारी यांनी सह.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक १०/०५/२०२३ रोजी मंजूर केलेली टिपण्णी

२. शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक –स्वमअ- २०२२/प्र.\क्र.७३/नवि ३४ दिनांक १५ जुलै,२०२२

३. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे पत्र क्र./ स्वमअ / Desludging Vehicle/ 139/२०२३-२४ दि. ०८ मे, २०२३ रोजीचे पत्र

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० या अभियाना अंतर्गत भुयारी गटर आणि सेप्टिक टाक्यांमध्ये धोकादायक पद्धतीने मानवी प्रवेश बंद करणे तसेच भुयारी गटर आणि सेप्टिक टाक्यांची संपूर्ण यांत्रीकीकृत यंत्रणेद्वारे स्वच्छता करण्यात येऊन हाताने मैला हाताळण्याच्या पद्धतीची शाश्वत समाप्ती करणे ही उद्दिष्ट्ये आहेत.

मैला पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रक्रिया न केलेला मल/ मलगाळ किंवा वापरलेले पाणी पर्यावरणात सोडले जाणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी आणि सर्व वापरलेले पाणी (सीवरेज आणि सेप्टेज, ग्रे वॉटर आणि ब्लॅक वॉटर सह) हे सुरक्षितरित्या बंदिस्तपणे, वाहतूक आणि प्रक्रिया केले जाईल हे उद्दिष्ट आहे. या अंतर्गत सर्व सेप्टिक टाक्या नियतकालीन स्वच्छ (डिस्लजिंग) करणे कामी उपकरणांची खरेदी करणेचे आहे.

राज्यातील १ लक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहराने किमान ODF++ व ५०% शहरांनी Water+ दर्जा गाठणे हे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० चे प्रमुरव उद्दिष्ट आहे. यासाठी शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांची उभारणी करण्याबरोबरच शहरातील सेप्टिक टॅक मधील मैला उपसा करणारे वाहने (Desludging Vehicle) खरेदी करणे आवश्यक आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० अंतर्गत आपल्या शहराचा शहर स्वच्छता कृती आरखडा मंजूर करण्यात आला असून शासनाकडील यादीनुसार अभियानांतर्गत सेप्टिक टँकमधील मैला उपसा करणारे 2 Desludging Vehicle विटा शहरास मंजूर आहेत व त्यासाठी रक्कम रुपये ५०,००,०००/- इतका निधी मंजूर केला आहे. याकामी येणारा अतिरिक्त खर्च नगरपरिषद फंडातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी सदरचे 2 Desludging Vehicle खरेदी करणेस मंजुरी देत आहे.याकामी पुढील आवश्यक ती नियमबद्ध कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद,विटा